फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्यात नवीन औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाचे महाविद्यालय कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबत...

## महाराष्ट्र शासन

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२२/प्र.क्र.२१९/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३० डिसेंबर, २०२२.

वाचा : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/पीसीआय/मान्यता/२०२२/१२१२, दि.२९.१२.२०२२.

**प्रस्तावना :**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्रशिक्षण यांनी वर नमूद दि.२९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सोबतच्या Annexure - A मध्ये नमूद औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये सुरू करण्यास कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून Annexure - A मध्ये नमूद केल्याप्रमाणे औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

**अटी व शर्ती**

१) सदर मान्यता ही कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता Annexure - A मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

Scanned with CamScanner

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनांने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, व संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तसेच संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १० दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२१२३०१४११४००८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by NITIN JYOTINATH GHIRATKAR
Date: 2022.12.30 16:36:14 +05'30'

( नि. ज्यो. घिरटकर )

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.



Scanned with CamScanner

## Annexure - A

## Higher and Technical Education Department Government Resolution No.Manyata-2022/C.R.219/TE-4, Dated- 30th December, 2022.

### List of New Unaided Pharmacy Institute, Approved by PCI from A.Y. 2022-23

| Sr. No. | PCI CODE | NAME OF THE TRUST WITH ADDRESS | NAME OF THE INSTITUTE WITH ADDRESS | STATUS | PROGRAMME | LEVEL OF COURSE | COURSE NAME | UNIVERSITY NAME | APPROVED INTAKE A.Y.2021-22 | INTAKE APPROVED BY PCI A.Y. 2022-23 | VARIATION |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5757 | Dnyandeep Shikshan Prasarak Mandal, Khed (Ratnagiri) , Khed (Khonde Rd.), Bhadgaon-Khonde, Tal.Khed, Dist-Ratnagiri - 415 709 | Dnyandeep College of Pharmacy, NH66 Mumbai Goa Highway, At Post Boraj, Ratnagiri - 415 709 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.PHARM | MUMBAI UNIVERSITY, MUMBAI | 0 | 60 | 60 |
| 2 | 6184 | V.M.Patil Krushi Pratishthan, Asangaon, Tal.Dahanu, Dist. Palghar. | YNP College of Pharmacy, 124, Raipada Road, At Post Asangaon Taluka Dahanu Dist. Palghar- 401 103 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.PHARM | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 | 60 |
| 3 | 7988 | Satchikitsa Prasarak Mandal, | Adarsh Institute of Pharmacy, 543, Nandanwan, Azamshah Layout, Jagnade Square, Tah.& Dist. Nagpur - 440 009 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.PHARM | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 | 60 |
| 4 | 5379 | Jai Malhar Sevabhavi Shikshan va Gram Vikas Sanstha, Manisha Building, Sanmitra Colony, Workshop Road, Nanded. | Saraswati Institute of Pharmacy, 233, Pangri Zaro Road, Pangri Zari Road, Nanded 431 606 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.PHARM | Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded | 0 | 60 | 60 |
| | | | | | | Diploma | D.PHARM | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | 0 | 60 | 60 |
| 5 | 7094 | Nagar Shikshan Vikas Mandal, Murum, Tal.Umerga, Dist.Osmanabad - 413 605 | Madhavrao Patil College of Pharmacy, Murum, 100, Main Road, Murum, Osmanabad - 413 605 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.PHARM | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 | 60 |
| | | | | | | Diploma | D.PHARM | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | 0 | 60 | 60 |
| 6 | 6439 | Ankush Shikshan Sanstha, 345, Shradha House, 6 th Floor, Kingsway, Nagpur - 440 001 | G.H.Raisoni Institute of Life Sciences, 37-39-1, Hingna Wadi Link Road, Shradha Park, Nagpur - 440 016 | Un-Aided | PHARMACY | UNDER GRADUATE | B.PHARM | Dr.Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | 0 | 60 | 60 |
| | | | | | | Diploma | D.PHARM | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | 0 | 60 | 60 |

Scanned with CamScanner